**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**जनसंपर्क विभाग**

**कामाचे नांव :-** नाशिक महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या योजनांची, प्रकल्पांची सोयी- सुविधांची व इतर सकारात्मक माहिती इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून ई-न्युज लेटरद्धारे जनमाणसापर्यंत पोहोचविण्यासाठी इंग्रजी ई-न्युज लेटरची निर्मिती करणेबाबत.

**संदर्भः-** दि.२०/०८/२०१६ रोजी मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली निविदा सुचना.

नाशिक महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या योजनांची, प्रकल्पांची सोयी-सुविधांची व इतर सकारात्मक माहिती इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून ई-न्युज लेटरद्धारे जनमाणसापर्यंत पोहोचविण्यासाठी इंग्रजी ई- न्युज लेटरची निर्मिती करणेसाठी संदर्भिय निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यात नमुद केले प्रमाणे दि.२३/०८/२०१६ रोजी प्रि-बिड मिटींगचे आयोजन करणत आले होते. सदर मिटींग मध्ये पुढील प्रमाणे सुचना/मुद्दे उपस्थित करुन त्याप्रमाणे दुरुस्ती करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे.

| अ.नं. | सुचनेचा / मागणीचा तपशील | शेरा / निर्णय |
|---|---|---|
| १ | संदर्भिय निविदा सुचनेत निविदा धारकाचे क्वॉलीफिकेशन पत्रकारीता डिग्री किंवा डिप्लोमा असे नमुद केले आहे. मात्र सद्यस्थितीत वृत्तपत्र संपादीत करीत असल्यास अशा संपादकाने वरील प्रमाणे अर्हता धारण केलेली नसली तरी त्यास निविदा भरण्यास पात्र धरण्यात यावे तसेच सदरचे काम हे डि.टी.पी. कोर्स केलेला अनुभवि इसम ही चांगल्या पध्दतीने करु शकतो. त्यास ही सदरचे कामाचे स्वरुप व व्याप विचारात घेता निविदा भरणेस पात्र ठरविण्यात यावे. अशी दुरुस्ती उक्त निविदेत करण्यात यावी अशी मागणी मे. नुक ॲण्ड कॉर्नर यांचे संपादकाचे वतीने करण्यात आली आहे. | सदरची सुचना / मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर निविदा भरण्यास वृत्तपत्राचे संपादक तसेच डि.टी.पी. कोर्स केलेला इसम ही पात्र धरण्यात यावा. |

सही/-

दिनांकः-२३/०८/२०१६

**उपआयुक्त(स्था.सं.क.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**